निवडणूक तात्काळ/ई-मेलद्वारे

माहे ऑक्टोबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकींसाठी राबविण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात सुधारीत निर्देश.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८ ऑगस्ट २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी,
सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)

**विषय:-** **माहे ऑक्टोबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकींसाठी राबविण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात सुधारीत निर्देश.**
**संदर्भ:-** आयोगाचा समक्रमांकाचा दि.०७/०७/२०१७ रोजीचा मतदार यादीचा कार्यक्रम.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाकडून वरील विषयाबाबत संदर्भांकित पत्रान्वये निर्गमित केलेल्या मतदार यादी कार्यक्रम राबविताना संबंधित जिल्ह्यांना आलेल्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात खालीलप्रमाणे सुधारीत निर्देश देण्यात येत आहेत :-

१. माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची कार्यवाही सप्टेंबर २०१७ मध्ये पार पाडणे आवश्यक आहे हे लक्षात घेता, आयोगाच्या उक्त संदर्भिय पत्राद्वारे देण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम हा माहे ऑक्टोबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींऐवजी **फक्त ऑक्टोबर २०१७ या कालावधीत मुदत सपंणाऱ्या १३ जिल्ह्यांतील ११७ ग्रामपंचायतींकरीताच** राबविण्यात यावा. (परिशिष्ट-१ मध्ये दर्शविल्यानुसार)

२. वर नमूद केलेल्या माहे ऑक्टोबर मध्ये मुदत संपणाऱ्या ११७ ग्रामपंचायतींपैकी ज्या ग्रामपंचायतींची महाऑनलाईनच्या आज्ञावलीमार्फत प्रभागनिहाय प्रारुप संगणकीकृत पद्धतीने तयार करण्याचे काम अद्याप अपूर्ण आहे अशा ग्रामपंचायतींशी संबंधित जिल्ह्यांनी गुरूवार दि.१० ऑगस्ट २०१७ पर्यंत प्रभागनिहाय प्रारुप मतदार याद्या संबंधित ठिकाणी प्रसिद्ध करावयाची कार्यवाही पार पाडावी. तसेच बुधवार दि.१६ ऑगस्ट २०१७ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांबाबत शनिवार दि.१९ ऑगस्ट २०१७ पर्यंत निर्णय घेवून सोमवार दि.२१ ऑगस्ट २०१७ पर्यंत अंतिम मतदार यादी संबंधित ठिकाणी प्रसिध्द करावयाची आहे. (परिशिष्ट २ मध्ये दर्शविल्यानुसार)

३. माहे नोव्हेंबर-२०१७ ते फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम आयोगाकडून अलाहिदा स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

४. उक्त कालावधीसाठी देण्यात आलेला मतदार यादीचा अंशत: सुधारीत कार्यक्रम विहीत मुदतीत पार पाडला जाईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

08/08/17

सोबत: परिशिष्ट-१ व २

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-

१. मा. सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र शासन.
२. मा. विभागीय आयुक्त (सर्व)
३. संगणकीकरण शाखा.
४. निवड नस्ती.

# परिशिष्ट-१

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८, दि. ०८/०८/२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

**राज्य निवडणूक आयोगाने आदेशित केलेला माहे ऑक्टोबर-२०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम राबविणाऱ्या जिल्ह्यांची सूची.**

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार माहे ऑक्टोबर- २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|
| १ | पालघर | ८ |
| २ | नाशिक | २३ |
| ३ | नंदूरबार | १ |
| ४ | अहमदनगर | १० |
| ५ | पुणे | १ |
| ६ | औरंगाबाद | ४ |
| ७ | नांदेड | ४ |
| ८ | उस्मानाबाद | १ |
| ९ | जालना | ४० |
| १० | हिंगोली | १३ |
| ११ | यवतमाळ | ७ |
| १२ | चंद्रपूर | ४ |
| १३ | गडचिरोली | १ |
| | एकूण | ११७ |

## परिशिष्ट-२

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८, दि. ०८/०८/२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

**राज्य निवडणूक आयोगाने आदेशित केलेला फक्त माहे ऑक्टोबर-२०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या १३ जिल्ह्यांतील ११७ ग्रामपंचायतींसाठी मतदार यादीचा अंशत: सुधारीत कार्यक्रम.**

**(मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक शनिवार दि. ०१.०७.२०१७)**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा सुधारीत दिनांक **(ज्या ग्रामपंचायतींची प्रारुप मतदार यादी दिनांक ०८.०८.२०१७ रोजी प्रसिद्ध करता येत नाही फक्त अशा ग्रामपंचायतींसाठीच)** | गुरूवार दि.१०/०८/२०१७ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | गुरूवार दि.१०/०८/२०१७ ते बुधवार दि.१६/०८/२०१७ पर्यंत |
| ३ | हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे. | शनिवार दि.१९/०८/२०१७ पर्यंत |
| ४ | प्रभागनिहाय मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | सोमवार दि. २१/०८/२०१७ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

Awande
08/08/17

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र